नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

| वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २५१ Issue - 251 | वार मंगळवार दि. २८ जानेवारी २०२५ Blow- Tuesday Date 28 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# वक्फ बोर्ड विधेयक; सत्ताधाऱ्यांच्या १२ सुधारणा मंजूर, विरोधकांच्या सर्व सुधारणा फेटाळल्या

## राज्य सरकारमार्फत नेमलेल्या व्यक्तीकडे राहणार अधिकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : प्रस्तावित वक्फ बोर्ड विधेयकावर सखोल चर्चा करण्यासाठी ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं. यावर दोन दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत मोठी खडाजंगी पाहायला मिळाली. या वादानंतर बैठकीत समितिचे अध्यक्ष जगदम्बिका पाल यांच्यावर हुकुमशाही कारभार करत असल्याचा आरोप विरोधी खासदारांकडून करण्यात आला. यावर गोंधळ घालणाऱ्या १० खासदारांना दिवसभरासाठी निलंबितही करण्यात आलं. यानंतर आज झालेल्या संयुक्त समितीच्या बैठकीत या विधेयकासंदर्भात सत्ताधाऱ्यांनी मांडलेल्या १२ सुधारणा मंजूर करण्यात आल्या असून विरोधी खासदारांनी मांडलेल्या ४४ सुधारणा फेटाळण्यात आल्या.

वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक २०२४ नुकत्याच संपलेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात मांडण्यात आलं. हे विधेयक संसदेच्या संयुक्त समितीकडे सविस्तर चर्चेसाठी पाठवण्यात आलं. यासंदर्भात समितीच्या सोमवारी झालेल्या बैठकीत १२ सुधारणा मंजूर करण्यात आल्या तर ४४ सुधारणा फेटाळण्यात आल्या. मंजूर करण्यात आलेल्या १२ सुधारणा या सत्ताधारी भाजपा आणि एनडीए आघाडीतील इतर मित्रपक्षांकडून मांडण्यात आल्या होत्या. तर फेटाळण्यात आलेल्या ४४ सुधारणा या विरोधी पक्षांकडून मांडण्यात आल्या होत्या.

सोमवारी या विधेयकात ज्या सुधारणा मंजूर करण्यात आल्या, त्यामुळे हे विधेयक अधिक चांगलं होऊ शकेल. यातून गरीब व पसमंदा मुस्लिमांना अधिकाधिक फायदा मिळवून देण्याचा सरकारचा हेतू साध्य होईल, अशी प्रतिक्रिया बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष



जगदम्बिका पाल यांनी दिली आहे.

या बैठकीत विरोधी पक्षांनी मांडलेल्या सर्व ४४ सुधारणा फेटाळण्यात आल्यामुळे विरोधकांवर अन्याय झाल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यावरही जगदम्बिका पाल यांनी उत्तर दिलं आहे. या विधेयकावर प्रत्येक कलमानुसार चर्चा करण्यासाठी बैठक बोलावण्यात आली होती. यावेळी विरोधी पक्षांकडून मांडण्यात आलेल्या सर्व ४४ सुधारणा मी त्यांच्या नावासकट वाचून दाखवल्या. मी त्यांना विचारलं की त्यांना या सुधारणा सुचवायच्या आहेत का? त्यानंतर त्या मांडल्या गेल्या. ही प्रक्रिया याहून अधिक लोकशाही पद्धतीने होऊ शकली नसती, अस जगदम्बिका पाल म्हणाले.

जर सुधारणा मांजल्या गेल्या आहेत आणि त्यांच्या बाजूने फक्त १० सदस्यांनी मत नोंदवलं आहे, तर मग अशा सुधारणा मंजूर होऊ शकतात का? संसद असो की संयुक्त संसदीय समिती असो, ही प्रक्रिया तितकीच नैसर्गिक आहे, असंही जगदम्बिका पाल यांनी नमूद केलं.

दरम्यान, जगदम्बिका पाल यांनी आज मंजूर झालेल्या सुधारणांपैकी काही सुधारणांचा उल्लेख केला. आज एक सुधारणा मंजूर करण्यात आली. आधी जमिनीच्या मालकीसंदर्भात निर्णय घेण्याबाबतचे सर्वाधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे होते. आता राज्य सरकारमार्फत नेमलेल्या व्यक्तीकडे हे अधिकार असतील. मग ती व्यक्ती आयुक्त असो वा सचिव, असं पाल यांनी सांगितलं.

याव्यतिरिक्त आणखी एक सुधारणा मंजूर करण्यात आली. ही सुधारणा वक्फ बोर्डाच्या रचनेसंदर्भात आहे. आधी वक्फ बोर्डावर दोनच सदस्य होते. सरकारकडून दोनऐवजी तीन सदस्य असावेत असं सुचवण्यात आलं. यामध्ये एका इस्लाम अभ्यासकाचाही समावेश असेल. विरोधकांनी यालाही विरोध केला, असं पाल म्हणाले.

# गाव तेथे नवी एसटी धावणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एस. टी. महामंडळाला स्वमालकीच्या दरवर्षी पाच हजार या प्रमाणे येत्या ५ वर्षात २५ हजार नव्या बसेस घेण्याच्या प्रस्तावाला उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी तत्वतः मान्यता दिली असून तसा प्रस्ताव लवकरात लवकर सादर करण्याच्या सूचना त्यांनी परिवहन विभागाला दिल्या आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.



सन २०२५-२६ अर्थसंकल्पासाठी परिवहन विभागाची आढावा बैठक उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीला वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे प्रधान सचिव ओ.पी गुप्ता, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, एस टी महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर उपस्थित होते.

परिवहन मंत्री श्री. सरनाईक म्हणाले, सध्या एसटी महामंडळाकडे १४ हजार ३०० बसेस असून त्यापैकी १० वर्ष पेक्षा जास्त जुन्या झालेल्या १० हजार बसेस आहेत. त्या पुढील ३-४ वर्षात प्रवासी सेवेतून बाद होतील. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, भविष्यात एसटीला आत्मनिर्भर होण्यासाठी स्वतः च्या बसेस घेणे आवश्यक आहे. त्यासाठी दरवर्षी ५ हजार नवीन बसेस याप्रमाणे पुढील ५ वर्षांमध्ये २५ हजार बसेस घेण्याची पंचवार्षिक योजना आखली असून त्याला अर्थमंत्र्यांनी परवानगी द्यावी, असा प्रस्ताव मांडण्यात आला असून उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी या प्रस्तावाची निकड लक्षात घेऊन तातडीने तत्वतः मान्यता दिली. त्याबद्दल परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

परिवहन मंत्री श्री. सरनाईक म्हणाले, दरवर्षी ५ हजार नवीन बसेस याप्रमाणे सन २०२९ मध्ये या २५ हजार बसेस व ५ हजार इलेक्ट्रिक बसेस याप्रमाणे ३० हजार बसेसचा ताफा एसटीकडे तयार असेल गाव तिथे एसटी आणि मागेल त्याला बस फेरी आपण देऊ शकणार आहोत.

आनंद दिघे साहेब यांच्या जयंती निमित्त उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी २५ हजार स्वमालकीच्या लालपरी बसेस घेण्याच्या प्रस्तावाला तत्वतः मान्यता देऊन एसटीवर प्रेम करणाऱ्या लाखो सर्वसामान्य जनतेला गोड भेट दिली आहे. याबद्दल परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी श्री. पवार यांचे आभारही मानले.

# 'जीबीएस' वर उपचारांविषयी सर्वंकष उपाययोजना करा : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : गुलियन बॅरे सिंड्रोम अर्थात 'जीबीएस' पसरलेल्या भागातील या आजारामागची कारणे शोधण्यासह पाणीपुरवठा स्रोतांची, पाणीपुरवठा करणाऱ्या खासगी व शासकीय टँकरमधील पाण्याची तपासणी, घरोघरी जाऊन सर्वेक्षण करणे, लक्षणे आढळलेल्या व्यक्तींना तात्काळ रुग्णालयात दाखल होण्यासाठी आवाहन तसेच जनजागृती करणे आदी सर्वंकष उपाययोजना कराव्यात, असे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांनी दिले. आजारातून बरे होण्याचे प्रमाण मोठे असून नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असेही ते म्हणाले.



विधानभवन येथे 'जीबीएस' आजाराविषयी आढावा बैठकीत मंत्री आबीटकर बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, राज्याचे आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन आंबाडेकर, प्रभारी अतिरिक्त विभागीय आयुक्त समिक्षा चंद्राकार, सहसंचालक आरोग्य सेवा बबीता कमलापूरकर, उपसंचालक डॉ. आर. बी. पवार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ येम्पल्ले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई, पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. नीना बोराडे, पिंपरी चिंचवड मनपाचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे आदी उपस्थित होते.

आरोग्यमंत्री श्री. आबीटकर म्हणाले, प्रामुख्याने हे रुग्ण आढळलेल्या भागातील पाण्यांचे नमुने घेऊन त्याची तपासणी करावी. आजारातील बहुतांश रुग्ण बरे होत असून एकदम थोड्य रुग्णांना व्हेंटिलेटरची आवश्यकता पडत आहे. त्यामुळे नागरिकांना घाबरुन जाऊ नये, याबाबत वेगवेगळ्या माध्यमातून जनजागृती करावी. पाणी उकळून पिणे, स्वत:ची रोगप्रतिकारक्षमता वाढविणे तसेच स्वच्छ पाण्याचा आग्रह धरणे या उपाययोजना महत्त्वाच्या असून त्याबाबत जनजागृती करावी.

यावेळी मंत्री श्री. आबीटकर आणि विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी राज्य शासनाचे आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच पुणे महानगर पालिका यांच्याकडून आढावा घेतला. या आजाराचे आजअखेर १११ आणि आज ससून रुग्णालयाने कळविल्याप्रमाणे १० संशयित रुग्ण आढळले आहेत. रुग्ण हे प्रामुख्याने सिंहगड रोड, खडकवासला, किरकिटवाडी, नांदेडगाव, नांदेडसिटी, धायरी, आंबेगाव या पुणे महानगरपालिका क्षेत्रातील तर काही रुग्ण पिंपरी चिंचवड मनपा आणि इतर जिल्ह्यातील आहेत.

या रुग्णांचा योग्य मार्ग (ट्रेस) ठेवण्याची व्यवस्था करावी. जेणेकरुन त्यांना कोणत्या कारणामुळे हा आजार झाला हे कळून येईल.

दररोजच्या रुग्णांची संख्या आणि बरे होणाऱ्या रुग्णांची आकडेवारी दररोज न चुकता सायंकाळी अद्यावत करावी. त्यासाठी रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयांशी संपर्क साधण्यासाठी आरोग्य विभाग आणि महानगरपालिकेने संपर्क अधिकारी नेमावेत. बाटलीबंद पाण्याचे नमुने अन्न व औषध प्रशासन विभागाने तपासावेत. जारमधून विकल्या जाणाऱ्या पाण्याची महानगरपालिकांच्या आरोग्य विभागाने तपासणी करावी, अशाही सूचना यावेळी देण्यात आल्या.

# नळदुर्ग येथील तलावात आढळले तीन मृतदेह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : तुळजापूर तालुक्यातील बाभळगाव येथील पुलाखाली तीन मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. यामध्ये एक महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. मृतदेह दोन दिवसांपूर्वी पाण्यात पडल्याचा पोलिसांचा अंदाज आहे. सोलापूर-हैदराबाद महामार्ग क्रमांक ६५ वर बाभळगाव गावाजवळील पुलाखाली हे मृतदेह आढळून आले. स्थानिकांनी मृतदेह पाहिल्यानंतर तात्काळ पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच नळदुर्ग पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह पाण्याबाहेर काढले असून त्यांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. आतापर्यंत एका पुरुषाची ओळख पटली असून तो आनंदनगर, मुरूम येथील रहिवासी असल्याचे समोर आले आहे. महिला आणि दुसर्या पुरुषाची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. प्राथमिक तपासात मृत्यूचे कारण समजू शकले नसल्याने पोलिसांनी घातपात की अपघात या दृष्टीने तपास सुरू केला आहे. मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात येणार असून त्यांचा अहवाल आल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

**'मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन'चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण** — **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

# गुन्हे सिद्धतेकरिता 'मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन' सुरू करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कायद्यानुसार ७ किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्ह्यांसाठी फॉरेन्सिक पुराव्यांचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. या सुधारणांचा एक प्रमुख भाग असलेली 'मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन' ची उपलब्धता महाराष्ट्रात सुरू करण्यात आली आहे. गुन्हे सिद्धतेकरिता अशी सुविधा सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे, असे प्रशंसोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज काढले.




सह्याद्री अतिथीगृह गृह येथे मुख्यमंत्र्यांच्याहस्ते मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे फित कापून आणि हिरवी झेंडी दाखवून लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी माध्यम प्रतीनिंधीशी संवाद साधला. मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात एकूण २५९ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन सुरू करण्यात येणार आहेत. त्यापैकी २१ पूर्णपणे सुसज्ज व्हॅन्स कार्यरत करण्यात आल्या आहेत. ब्लॉक चेन तंत्रज्ञानाचा वापर करून क्राईम सीन प्लिकेशन गुन्हे स्थळावर तपासणी करणार आहे. यामध्ये पुरावे सग्रहीत करून बारकोडद्वारे सुरक्षित करण्यात येणार आहे. गुन्ह्यांच्या उलगडा करण्यामध्ये फॉरेन्सिक सहाय्य पुरविण्यासाठी, पुरावे गोळा करणे व विश्लेषण करण्यासाठी ही व्हॅन उपयुक्त ठरणार आहे.

या व्हॅनमध्ये रक्त, डीएनए संग्रहण आणि बलात्कार गुन्ह्यात आवश्यक पुरावे गोळा करता येणार आहे. वैज्ञानिक तज्ज्ञ व सहायक कर्मचारी व्हॅनमध्ये असतील. तसेच स्फोटक पदार्थ तपासणी, सायबर गुन्ह्यांमध्ये तपासणीसाठी विशेष फॉरेन्सिक किट्स उपलब्ध असणार आहेत. तसेच व्हॅन सीसीटिव्हीने सज्ज असणार आहे. या व्हॅन कनेक्टेड असणार आहेत. त्यामुळे सबंधित पोलीस स्टेशनला सबंधित गुन्ह्याकामी गोळा केलेल्या पुराव्यांची माहिती देता येणे शक्य होणार आहे ही एकत्र प्रणाली असून यामध्ये सुसज्ज मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन, फॉरेन्सिक किट्स, फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि क्राईम सीन प्लिकेशन यांचा समावेश आहे. यामुळे पुरावे गोळा करण्याची प्रक्रिया अधिक कार्यक्षम आणि अचूक बनणार आहे. तपास यंत्रणा आणि फॉरेन्सिक तज्ज्ञ यांच्यात उत्तम समन्वय साधला जाणार आहे. पुरावे नष्ट करणे, पुरव्यांशी छेडछाड करून आरोपींना शिक्षेपासून आता कुणीही वाचवू शकणार नाही. त्यामुळे गुन्हेगारांमध्ये भीती निर्माण होवून गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण निश्चितच वाढणार आहे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाला राज्यमंत्री गृह (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, मा. मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव राधिका रस्तोगी, प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, महासचालक (न्याय व तांत्रिक) संजय वर्मा, न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय संचालक डॉ. संगीता घुमटकर, उपसचिव राजेंद्र भालवणे आदीसह गृह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### अशी काम करणार फॉरेन्सिक मोबाईल व्हॅन

**जेव्हा गुन्हा नोंदविला जातो, तेव्हा नियंत्रण कक्ष फॉरेन्सिक पथकाला सूचित करेल. फॉरेन्सिक पथक गुन्हे स्थळाला भेट देऊन ते गुन्ह्याची माहिती नोंदवून क्राईम सीन प्लिकेशनमध्ये अद्ययावत करतील. फॉरेन्सिक तज्ज्ञ गुन्ह्याचे ठिकाणी छायाचित्रे आणि व्हिडिओच्या माध्यमातून दस्तऐवजीकरण करतील. तसेच वरिष्ठ तज्ज्ञांशी व्हिडिओ कॉन्फरनसद्वारे संपर्क साधून पुराव्यांचे संकलन आणि तपासणी करून पुरावे पुन्हा तपासून सील केले करतील. त्यानंतर क्राईम सीन रिपोर्ट तयार करून पोलीस तपास अधिकाऱ्याकडे सुपूर्द केला जाईल.**

# एसटीच्या दरवाढी विरोधात ठाकरे शिवसेनेच्या वतीने चक्काजाम आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : महाराष्ट्राच्या गोरगरीबांची जीवनवाहिनी असलेल्या एसटी बसच्या तिकीट दरात एकाचवेळी १५ टक्के दरवाढ करण्याचा जाचक निर्णय सर्वसामान्यांसाठी, शेतकऱ्यांसाठी, नागरिकांसाठी अत्यंत जाचक आहे. राज्य सरकारने राज्यातील जनतेवर लादलेला हा निर्णय तातडीने रद्द करावा. अशी मागणी लातूर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांनी यावेळी केली.




एसटीच्या तिकीटाची भाडेवाढ राज्यात आजपासून लागू झाली आहे. त्यामुळे शहरातील आणि खेडोपाड्यातील सर्वसामान्य नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याची दखल घेत ठाकरे शिवसेनेच्या वतीने लातूर येथे जुना रेणापूर नाका मध्यवर्ती बस स्थानकासमोरील गेटवर चक्काजाम आंदोलन करण्यात आले. यावेळी विभागीय नियंत्रक यांच्यामार्फत शासनाकडे पत्राद्वारे मागणी करण्यात आली आहे.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक, उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव महानगर प्रमुख सुनील बसपुरे, युवा सेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, शहरप्रमुख विष्णूपंत साठे,रेणापूर तालुकाप्रमुख परमेश्वर सुर्यवंशी, त्र्यंबक स्वामी रमेश मामा माळी अजित सोमवंशी, बस्वराज मंगरुळे राजाभाऊ घरटमल, विष्णू कांबळे, राजु कतारे, रफीक नाना राहुल रोडे खंडु जगताप, दिलिप भालेकर, समद शेख, दत्तु मोरे, प्रशांत मठ्ठ, करण शिंदे, महेश गायकवाड आदी सह शिवसैनिक उपस्थित होते

## संपादकीय....

### गाव तेथे एसटी

एस. टी. महामंडळाला स्वमालकीच्या दरवर्षी पाच हजार या प्रमाणे येत्या ५ वर्षात २५ हजार नव्या बसेस घेण्याच्या प्रस्तावाला उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी तत्वतः मान्यता दिली असून तसा प्रस्ताव लवकरात लवकर सादर करण्याच्या सूचना त्यांनी परिवहन विभागाला दिल्या आहेत. सन २०२५-२६ अर्थसंकल्पासाठी परिवहन विभागाची आढावा बैठक उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली. परिवहन मंत्री श्री. सरनाईक म्हणाले, सध्या एसटी महामंडळाकडे १४ हजार ३०० बसेस असून त्यापैकी १० वर्ष पेक्षा जास्त जुन्या झालेल्या १० हजार बसेस आहेत. त्या पुढील ३-४ वर्षात प्रवासी सेवेतून बाद होतील. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, भविष्यात एसटीला आत्मनिर्भर होण्यासाठी स्वतः च्या बसेस घेणे आवश्यक आहे. त्यासाठी दरवर्षी ५ हजार नवीन बसेस याप्रमाणे पुढील ५ वर्षांमध्ये २५ हजार बसेस घेण्याची पंचवार्षिक योजना आखली असून त्याला अर्थमंत्र्यांनी परवानगी द्यावी, असा प्रस्ताव मांडण्यात आला असून उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी या प्रस्तावाची निकड लक्षात घेऊन तातडीने तत्वतः मान्यता दिली. आनंद दिघे साहेब यांच्या जयंती निमित्त उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी २५ हजार स्वमालकीच्या लालपरी बसेस घेण्याच्या प्रस्तावाला तत्वतः मान्यता देऊन एसटीवर प्रेम करणाऱ्या लाखो सर्वसामान्य जनतेला गोड भेट दिली आहे. याबद्दल परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी श्री. पवार यांचे आभारही मानले.त्याबद्दल परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी त्यांचे आभार मानले आहेत. परिवहन मंत्री श्री. सरनाईक म्हणाले, दरवर्षी ५ हजार नवीन बसेस याप्रमाणे सन २०२९ मध्ये या २५ हजार बसेस व ५ हजार इलेक्ट्रिक बसेस याप्रमाणे ३० हजार बसेसचा ताफा एसटीकडे तयार असेल गाव तिथे एसटी आणि मागेल त्याला बस फेरी आपण देऊ शकणार आहोत.

# केंद्रीय संचार मंत्री जोतिरादित्य सिंधिया यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : केंद्रीय संचार, पूर्वोत्तर क्षेत्र विकास मंत्री जोतिरादित्य सिंधिया यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांच्या हस्ते केंद्रीय मंत्री जोतिरादित्य सिंधिया यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले , तहसीलदार सचिन लंगुटे, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, पोस्टमास्तर जनरल पुणे रिजन रामचंद्र जायभाये,अधीक्षक डाक घर चंद्रकांत भोर यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# अनंत चैतन्य प्रशालेच्या वतीने मतदान जनजागृती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




अक्कलकोट : आपल्या भारत देशात विविध भाषा, वेशभूषा, जातीधर्म असूनही जगातील सर्वात मोठा लोकशाही देश गणला जातो, विवधेतून एकता ही राष्ट्राची ताकत आहे. आपल्या देशातील लोकशाही संपूर्ण जगात भक्कम व यशस्वी असल्याचे भारत निवडणूक आयोगाने जगाला वेळोवेळी दाखवून दिले आहे. अशा या भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाली. तेंव्हापासून हा दिवस देशभर राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जात आहे त्याचेच औचित्य साधून महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर च्या वतीने आपल्या भारतीय लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी , देशाच्या हितासाठी प्रत्येक नागरिकांनी मतदान करणे आवश्यक असल्याने नागरिकांमध्ये

मतदानाचा हक्क व कर्तव्य याविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हन्नूर गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो , आपले मत आपले भविष्य मतदान करा मतदान करा, लोकशाहीचा मान करा अशा घोषणांनी लोकांना मतदानाचा पवित्र हक्क बजावण्यासाठी प्रेरित केले.यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे,पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री.अप्पासाहेब काळे, छायाचित्र विभाग प्रमुख श्री.धनंजय जोजन,शशी अंकलगे,प्रा.रविंद्र कालीबत्ते, रमेश शिंदे, काशीनाथ पाटील, जेष्ठ शिक्षक शहाजी माने, सुरेश जाधव, राजेंद्र यंदे,अब्दुलअजीज मुल्ला,सांस्कृतिक सहाय्यिका सौ.मल्लम्मा चप्पळगाव मॅडम,प्रयोगशाळा सहायक श्री.स्वामीनाथ कोरे उपस्थित होते. या स्तुत्य व महत्वपूर्ण उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व आ.मा. सचिनदादा कल्याणशेट्टी, जेष्ठ संचालक श्री.मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य श्री. सिध्देश्वर कल्याणशेट्टी, संचालिका सौ. शांभवी कल्याणशेट्टी, हन्नूर उपसरपंच मा.सागर कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती, सी. ई. ओ. सौ. रूपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ.पुनम कोकळगी यांनी अभिनंदन केले.

# आमदार अभिजीत पाटील यांनी दिलेला शब्द पाळला; दर सोमवारी भरवला जनता संवाद



## माढा शहरातील जिल्हा परिषद शाळेला सदिच्छा भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माढा/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या रणधुमाळी मध्ये आमदार अभिजीत आबा पाटील यांनी सभेमध्ये मतदारसंघातील जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी जनता संवाद भरवणार असल्याचा शब्द दिला होता. त्यांनी पाळला तो शब्द खथा करत दि.२७ जानेवारी दिवशी उस्फूर्त नागरिकांच्या प्रतिसादामध्ये जनतेचे प्रश्न, तक्रारी व निवेदन सोडविण्यात आले. इथून पुढेही दर सोमवारी आमदार अभिजीत आबा पाटील यांचे जनसंपर्क कार्यालय, ग्रामीण रुग्णालय समोर, माढा येथे जनता संवादाच्या माध्यमातून मतदार संघातील जनतेच्या, शेतकऱ्यांच्या, मतदार संघातील प्रत्येक नागरिकांच्या समस्या आणि अडचणी जाणून घेऊन त्यांचे निवारण केले आहेत.

**माढ्यातील क्रिडागण मैदानाची आमदार पाटील यांची अधिकाऱ्यांसोबत केली पाहणी**

# एमआयडीसी बैठक; मंगळवेढा एमआयडीसीत जागा घेऊन व्यवसाय सुरु न करणाऱ्यांच्या जागा परत घ्या



**आमदार समाधान आवताडे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढा शहरालगत असलेल्या एमआयडीसीमध्ये अनेक लोकांनी व्यवसायासाठी जागे घेतले आहेत मात्र त्या जागेवर व्यवसाय सुरू न करता शेड मारून फक्त जागा गुंतवून ठेवल्या आहेत अशा लोकांना नोटीसा काढून त्या जागा परत घ्या,व तात्काळ व्यवसाय करणाऱ्यांना जागा उपलब्ध करून द्या अशा सूचना आमदार समाधान आवताडे यांनी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना दिल्या ते मंगळवेढा येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित केलेल्या अधिकाऱ्यांच्या व व्यावसायिकांच्या बैठकीत बोलत होते यावेळी व्यासपीठावर नगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अजित जगताप,भाजपचे जिल्हा संघटक शशिकांत चव्हाण, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर, सुरेश भाकरे, तानाजी काकडे प्रकाश आप्पा गायकवाड औदुंबर वाडदेकर यांचे सह एमआयडीसीचे अधिकारी उपस्थित होते.

**यावेळी पंढरपूरच्या एमआयडीसी बाबत अधिकाऱ्यांनी माहिती देताना सांगितले की जागा हस्तांतर करून घेण्याची प्रक्रिया सुरू असून संयुक्तिकरित्या मोजणी करून लवकरच जागा हस्तांतर करून घेण्यात येईल यावेळी आमदार समाधान आवताडे यांनी लवकरात लवकर जागा हस्तांतरण करून घेण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या**

यावेळी बोलताना ते म्हणाले की एकूण ९४ हेक्टर जागा ही एमआयडीसीसाठी आरक्षित आहे त्यामधील ४० हेक्टर जागेवर सोलर कंपनी असून उर्वरित जागा या व्यवसायासाठी अनेक व्यावसायिकांनी घेतल्या पण व्यवसाय सुरू केले नाहीत अशांना नोटीस काढून दोन महिन्याची मुदत द्या जे दोन महिन्यात व्यवसाय सुरू करत नाहीत त्यांच्या जागा परत घ्या व नवीन व्यवसाय सुरू करू पाहणाऱ्या लोकांसाठी खुल्या करा त्याचबरोबर पाण्याची सोय करा, दिवाबत्ती, विजेची सोय या सर्व बाबींकडे गांभीर्याने लक्ष देऊन येथील एमआयडीसी मध्ये लोकांच्या हाताला काम मिळेल असे नियोजन करून त्वरित व्यवसायिकांना जागावाटप करण्याच्या सूचना देत आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर एमआयडीसीच्या कामाचाही आढावा घेतला.

# दहा लाख रुपयांची मागणी; पाच लाख स्वीकारताना मंगळवेढ्याचे दोन पोलीस कर्मचारी अँटी करप्शनच्या जाळ्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

मंगळा पोलीस स्टेशनचे दोन पोलिसांनी या दोघांनी भविष्यात दाखल होणाऱ्या गुन्ह्यांमधून तक्रारदार यांची आरोपी म्हणून असलेली नाव कमी करण्यासाठी तसेच इतर नातेवाईक यांना पुण्यामध्ये अटकपूर्व जामीन साठी सहकार्य करण्यासाठी दहा लाख रुपये लाचेची मागणी करून पहिला हप्ता म्हणून पाच लाख रुपये स्वीकारताना सांगली येथील लाचलुचपत विभागाच्या पथकाने रंगेहात पकडल्याने मंगळयाच्या पोलिस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

या घटनेची हकीकत अशी यातील आरोपी पोलीस हवालदार महेश कोळी व पोलिसांबलदार वैभव घायाळ मागील काही वर्षापासून मंगळा पोलीस ठाण्यात ते दोघे कार्यरत आहेत. तक्रारदार यांच्याविरुद्ध मंगळवेढा पोलीस ठाण्यात एक अर्ज दाखल असून अर्ज चौकशी करून भविष्यात दाखल होणाऱ्या गुन्ह्यांमधून यातील तक्रारदार यांची आरोपी म्हणून असलेली नावे कमी करण्यासाठी तसेच तक्रारदार यांचे इतर नातेवाईक यांना गुन्ह्यांमध्ये अटकपूर्व जमिनीसाठी सहकार्य करण्यासाठी वरील आरोपींनी दहा लाख रुपये लाचेची रक्कम गुन्ह्यातील रिकवरी च्या नावाखाली मागितली असल्याचे पडताळणीत निष्पन्न झाल्याची वृत्तपत्रा प्रसिद्धीसाठी पत्रकात दिलेल्या लाचलोपत प्रतिबंधक पथकाने दिली आहे.

दरम्यान दहा लाखापैकी पहिला हप्ता पाच लाख रुपये दोन्ही आरोपीने स्वीकारताना लाच लुचपत पथकाने सदरची कारवाई केली आहे.

या दरम्यान दहा लाखांपैकी पहिला हप्ता पाच लाख रुपये आरोपींना स्वीकारताना पथकाने रंगत पकडले कारवाई कोणी विभागाचे पोलीस आयुक्त श्री सरदेशपांडे नागपूर पोलीस आयुक्त शितल जानवे खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपाधीक्षक उमेश पाटील पोलीस निरीक्षक किशोर कुमार खाडे पोलीस अंमलदार ऋषिकेश वडणेकर प्रीतम चौगुले अजित पाटील यांच्या पथकाने दिनांक २५ रोजी ही कारवाई केली व मंगळवेढा पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती दरम्यान प्रजासत्ताक दिनाचे पूर्व संडेला ही घटना घडल्याने पोलीस दलात खळबळ उडाले आहे व मंगळवेढा पोलीस ठाण्यात काही पोलीस भ्रष्ट मार्गाने संपत्ती जमवण्यासाठी चुकीच्या पद्धतीने वागत असल्याचे दिसून येत असून त्या भ्रष्ट पोलीस कर्मचाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी होत आहे पोलिसांच्या या भ्रष्ट वागण्यामुळे येथील पोलीस ठाणे व मंगळवेढा तालुक्याचे नाव बदनाम होत असल्याची तक्रार सर्वसामान्य नागरिक व जनतेतून होत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

**प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य करणार : पालकमंत्री जयकुमार गोरे



## पालकमंत्र्यांच्या हस्ते पोलीस परेड ग्राउंड येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : विकासाच्या दिशेने वाटचाल करणारा आपला सोलापूर जिल्हा उद्योग, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, वैद्यकीय, सांस्कृतिक आणि पर्यटन क्षेत्रात चौफेर प्रगती करत असून जिल्हयाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

भारतीय प्रजासत्ताक दिना-चा ७६ वा समारंभानिमित्त पो-लीस आयुक्त मुख्यालय पोलीस परेड ग्राउंड येथे सकाळी ९.१५ वाजता मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शितल उगले तेली, शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर शहर मध्य चे आमदार देवेंद्र कोठे, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निव-ासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांच्यासह सर्व विभाग प्रमुख तसेच स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ नागरिक व अन्य मान्यवर नागरिक उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे पुढे म्हणाले की, आपला भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. आपण २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटना स्वीकारुन ती २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आणली. भारतीय लोकशाही प्रणा-लीचा दीपस्तंभ ठरलेली राज्यघटना ज्या समितीने तयार केली, त्या घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. संविधान निर्मितीम ध्ये त्यांचं बहुमोल योगदान लाभलं. नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या आपल्या भारत देशाने २६ जानेवारी १९५० रोजी संविधान अंमलात आणून लोकशाहीतील एका नव्या पर्वाचा शुभारंभ केला होता. त्यामुळे आपण सर्व भारतीय नागरिक हा दिवस देशभरात अत्यंत उत्साहानं साजरा करतो.

सोलापूर जिल्ह्यात मुख्यमंत्री म ाझी लाडकी बहीण योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. आज रोजी पर्यंत सोलापूर जिल्ह्यात एकूण ११ लाख २० हजार अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १० लाख ५५ हजार अर्ज मंजूर करण्यात आलेले आहेत. तसेच राज्यातील मुलींच्या सक्षमीकरणासाठी १ एप्रिल २०२३ नंतर जन्मलेल्या मुलींसाठी शासनाने लेक लाडकी योजना सुरू केली आहे. सोला-पूर जिल्ह्यामध्ये आज रोजी पर्यंत लेक लाडकी योजनेअंतर्गत ६ हजार १४४ लाभार्थी बालिकांना लाभाच्या पहिल्या टप्प्याची रक्कम प्रति बालिका ५ हजार रुपये प्रमाणे ३ कोटी ७ लाख २० हजार लाभार्थी बालिका व मातेच्या संयुक्त बँक खात्यावर जमा करण्यात आलेली आहे, अशी माहिती पालकमंत्री श्री गोरे यांनी दिली.

सोलापूर जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा जिल्हा आहे. पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर पर्यटन पूरक उद्योग वाढवून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती शक्य आहे. यामुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला वेग येईल, तसेच येथून होणारे स्थलांतर ही थांबण्यास मदत होणार आहे. राज्य शासनाने सोलापूर जिल्ह्याच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यासाठी एकूण २८२.७५ कोटीचा निधी मंजूर केलेला आहे. श्री क्षेत्र पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मि णी च्या दर्शनासाठी लाखो भाविक दरवर्षी येत असतात. परंतु भाविकांना दर्शनासाठी खूप वेळ दर्शन रांगेत उभे राहावे लागते त्यामुळे दर्शन मंडप व दर्शन रांग याकरिता १२९.४० कोटीचा आराखडा शासनाने मंजूर केला असून

- **जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळाला**
- **सोलापूर येथून लवकरच विमान सेवा सुरू होणार**
- **जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यातील कामे पूर्ण झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार**
- **पालकमंत्री यांच्याकडून सर्व नागरिकांना भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा**

ही कामे लवकरच सुरू होणार आहेत. पंढरपूर देवस्थान मंदिर विकासाकरिता ७३.८५ कोटीचा आराखडा मंजूर करण्यात आलेला असून या अंतर्गत कामे पूर्ण झाल्यानंतर त्याचा लाभ भाविकांना मिळणार असल्याचे पालकमंत्री श्री गोरे यांनी सांगितले.

सोलापूर येथून लवकरच विम ान सेवा सुरू होणार आहे. तसेच मुख्यमंत्री महोदयांच्या शंभर दिवसात उद्दिष्ट पुर्ती कार्यक्रमाचे प्रभावी अंम लबजावणी करण्यात येणार आहे. त्याप्रमाणेच केंद्र व राज्य शासन बेघरांना स्वतःचे घरकुलाचे स्वप्न पूर्ती करण्यासाठी प्रयत्नशील असून जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना व अन्य सर्व आवास योजनेचे अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२४-२५ आर्थिक वर्षात ७०२ कोटी निधी मंजूर आहे. या सर्व निधीतून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची कामे घेण्यात आलेली आहेत. बेटी बचाओं बेटी पढ़ाओ ही योजना राबविण्यात येते. या योजनेला दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी दहा वर्षे पूर्ण होत आहेत. महिला व बालविकास विभागाच्या वतीने जिल्ह्यात दिनांक २२ जानेवारी २०२५ ते ०८ मार्च २०२५ या कालावधीत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. या माध्यमातून नागरिकांचे मोठ्या प्रमाणात प्रबोधन करावे, असे आवाहन पालकमंत्री श्री. गोरे यांनी केले.

जलयुक्त शिवार अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबवून संपूर्ण जिल्हा पाणीदार करण्यासाठी यंत्रणांनी प्रयत्न करावेत असे निर्देश पालकमंत्री श्री गोरे यांनी देऊन कृषी क्षेत्रातील कृषी विषयक माहिती आणि डिजिटल सेवा देण्यासाठी ग्रिस्टॅक योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे त्यांनी सुचित केले. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास म हामंडळाच्या माध्यमातून राज्यभरात एक लाख मराठा उद्योजक बनवण्याचे संकल्प पूर्ती झालेली आहे. प्रत्येक घरावर सौर ऊर्जा पॅनल बसून प्रधानमंत्री सुर्यघर योजनेत सहभागी होण्याचे आवाहनही पालकमंत्री श्री. गोरे यांनी केले.पोलीस परेड ग्राउंड येथे सकाळी ठीक नऊ वाजून पंधरा मिनिटांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी परेड कमांडर परिविक्षा दिन पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा वी. एस. यांचे समवेत परेड संचलन केले. त्यानंतर पतसंचलन झाले. यावेळी भारतीय उद्देश पत्रिकेचे वाचन करण्यात आले तसेच पालकमंत्री म होदय यांनी सर्व उपस्थित नागरिकांना तंबाखू विरोधी दिन व कुष्ठरोग मुक्त भारत बाबत शपथ दिली. त्यानंतर पोलीस विभाग, कृषी विभाग, सैनिक कल्याण विभाग, शिक्षण विभाग, म हिला बालकल्याण, क्रीडा विभागाचे पुरस्कार वाटप पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले.

या ध्वजारोहण कार्यक्रमास उप-स्थित स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी, ज्येष्ठ नागरिक अन्य मान्यवर नागरिक यांचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी भेट घेऊन त्यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात...

### अज्ञात महिलेने चोरले मंगळसूत्र

सोलापूर : होम मैदान गड्डा यात्रा येथे फिरण्यासाठी गेले असता गळ्यातील पाच




ग्रॅम वजनाचे चाळीस हजार रुपये किमतीचे अर्धा तोळ्याचे सोन्याचे मनीमंगळसूत्र चोरून नेल्याची घटना २६ जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी पुष्पा विजय रजपूत (वय ३८, रा. घर नंबर ८४ नेहरूनगर विजापूर रोड) यांनी सदर बाझार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### काम बंद करीत पंधरा लाखाचा ऐवज केला प्रसार

सोलापूर : उत्तर सोलापूर तालुक्यातील दहिटणे येथे योगायतन जी जी इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड कंपनी मुंबई दहिटणे येथे येऊन काम बंद करण्यास सांगून कंपनीतील पंधरा लाख रुपये किमतीच्या पाच हायवा एक पोकलेन घेऊन गेल्याची घटना २४ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊ ते दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी सुहास विश्वास पाटील (वय ४४, रा. मु. पो. नानेगाव खुर्द, ता. पाटण, जि. सातारा) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून प्रभाकर चव्हाण व इतर पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# सरपंच परिषद यांच्या सोलापूर जिल्ह्याच्या दिनदर्शिकेचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते प्रकाशन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर / अक्कलकोट ( प्रतिनिधी ) : सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र यांच्या सोला-पूर जिल्ह्याच्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा ग्राम विकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री ना.जयकुमार गोरे साहेब, आमदार श्री सचिन (दादा) कल्याणशेट्टी व जिल्हाधिकारी श्री कुमार आशीर्वाद साहेब यांच्या हस्ते सोलापूर मध्ये करण्यात आले. सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्रच्या सोलापूर जिल्हा पदाधिकारी यांच्या वतीने सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्रचे प्रदेश उपाध्यक्ष ड विकास जाधव, जिल्हाध्यक्ष आदिनाथ देशमुख, जिल्हा सम न्वयक वनिताताई सुरवसे,अम ोल दुरंदे व इतर पदाधिकारी यांच्या संकल्पनेतून सरपंच दिनदर्शिका दरवर्षी तयार केली जात आहे.

प्रदेश उपाध्यक्ष ॲड विकास जाधव, जिल्हा समन्वयक सौ वनिता सुरवसे आणि सर्व पदाधिकारी सरपंच परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात शाश्वत


### सरपंच सौ. वनिता सुरवसे यांच्या कार्याचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी केले कौतुक

विकास कामांसाठी येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी अत-ोनात प्रयत्न करत आहेत.

त्यांच्या पाठीशी आम्ही ठामपणे उभे राहू असे आश्वासन ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे साहेबांनी प्रकाशनावेळी दिले. परिषदेमार्फत सर्व सरपंचाच्या अडचणी आमच्यापर्यंत पोहोचव-ताय आणि आम्ही त्याचे निराकरण शंभर टक्के करतोय, पुढेही सरपंच परिषदेचे असेच काम चालू राहू द्या, जिल्हा समन्वयक सौ वनिता ताई यांनी दरवर्षी अक्कलकोट तालुक्यात तीन हजार व सोल-ापूर जिल्ह्यात तीस हजार हजार दिनदर्शिका वाटप करत असतात, गेल्या ३ वर्षांपासून त्यांचे कॅलेंडर सर्वांना पोहचत आहे, त्यांच्या हातून असेच समाजकार्य घडो अशा शुभेच्छा जिल्हाध्यक्ष तथा अक्कलकोटचे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी सरपंच परिषद व सरपंच सौ वनिता सुरवसे यांना दिल्या.

या प्रकाशन सोहळ्यास आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, जिल्हाधिकारी श्री कुम ार आशिर्वाद, प्रदेश उपाध्यक्ष ॲड विकास जाधव, गोगावच्या सरपंच तथा सरपंच परिषदेच्या सोलापूर जिल्ह्याच्या समन्वयक सौ.वनिता सुरवसे, जिल्हाध्यक्ष आदिनाथ देशमुख, जिल्हाध्यक्ष कविताताई घोडके, भागातील सरपंच व इतर पदाधिकारी उपस्थीत होते.

# भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापनानिमित्त विठ्ठल रुक्मिणी मंदिरास आकर्षक फुलांची सजावट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक व नयन रम्य अशी तिरंगा ध्वजाप्रमाणे फुलांची सजावट करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील श्रींचा गाभारा व नामदेव पायरी येथे झेंडू, शेवंती, कामिनी आदी एक टन फ ुलांची सजावट करण्यात आली आहे. महत्त्वाचे सण उत्सव, खास दिवस या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात फुलांची आरास, सजावट केली जाते. सदरची सजावट पुणे येथील मोरया ग्रुपचे सचिन चव्हाण यांनी सेवाभावी तत्वावर मोफत करून दिली असून, यासाठी शिंदे ब्रदर्स यांचेकडील १५ कारागिरांनी परिश्रम घेतले. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून केलेली विद्युत रोषणाई व फुलांची सजावटीने भाविक दर्शनरांगेत अधिक गर्दी करीत आ-हेत. पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, या जयघोषा बरोबर भारत माता की जय, अशा घोषणा दर्शनरांगेत सुरू आहेत.

**नळदुर्ग शहरातल्या विविध शाळेतील विद्यार्थी विद्यार्थीनीनी ही दिली मानवंदना**

**प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध शाळेत पारितोषक वितरण समारंभ सोहळा संपन्न**

# नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ल्यात तिरंगा ध्वजाला पोलीस प्रशासनाकडून सन्मानपूर्वक मानवंदना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

नळदुर्ग ऐतिहासिक नगरीत म हाराष्ट्रात सर्वात मोठा किल्ला म्हणून ओळखला जातो या ऐतिहासिक शहरात खुप मोठ्या प्रमाणात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला यामध्ये ऐतिहासिक किल्ल्याम ध्ये नळदुर्ग शहरातील अप्पर तहसिलदार जगताप व पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या प्रमुख हस्ते फोटो प्रतिमा पुजन करण्यात आले यावेळी अप्पर तहसिलदार जगताप व पोलीस निरीक्षक गजेंद्र



सरोदे यांच्या हस्ते तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले यावेळी सहाय्यक पोलीस निरिक्षक साळुंखे पोलीस उप निरीक्षक ईश्वर नांगरे व पोलीस कर्मचारी यांनी सन्मान पुर्वक मानवंदना दिली याबरोबर नगर परिषद नळदुर्ग येथील मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांच्या हस्ते ध्वज-ारोहण करण्यात आले.

यावेळी डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लीश मेडीयम स्कुलचे मुख्य प्रवर्तक तथा संस्थापक मारुती खा-रवे नळदुर्ग यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले सय्यद अब्दुल्ला मेम ोरीयल उर्द हायस्कुल , जिल्हा परिषद कन्या प्रशाला नळदुर्ग , हुतात्मा स्म ारक नळदुर्ग डॉ बाबासाहेब आंबेडकर शासकीय वस्तीगृह अधिक्षक एम एस शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण तर नळदुर्ग येथे उप जिल्हा रुग्णालय नळदुर्ग आदि ठाकाणी प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध स्पर्धा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्याचे पारितोषीक वितरण समारंभ विद्यार्थ्यांना शैक्षणिक चालना मिळावी प्रेरणा मिळावी यासाठी वह्या पेन मिडल रजिस्टर पुष्प गुच्छ देऊन विद्यार्थांना गौरविण्यात आले . यावेळी नळदुर्ग शहरातील ऐतिहासिक किल्ल्यात गावातील माजी नगराध्यक्ष सह माजी नगरसेवक प्रतिष्ठीत नागरिक



मंडल अधिकारी तलाठी यांच्या सह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) ची बैठक खासदार प्रणिती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न

## समितीमध्ये जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या केंद्र शासनाच्या विविध योजनांचा सविस्तर आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, दिनांक २५(जिमाका):- केंद शासनाच्या विविध योजनांचा सविस्तर आढावा जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीच्या बैठकीत खासदार प्रणिती शिंदे यांनी घेऊन सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून जिल्ह्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत केंद्रीय योजनांचे लाभ पोहचेल याची दक्षता घेण्याची सूचना त्यांनी दिल्या.

नियोजन भवन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) च्या बैठकीस खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर, आमदार सर्वश्री अभिजीत पाटील, नारायण पाटील, डॉ. बाबासाहेब देशमुख, राजू खरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मनपा आयुक्त शितल उगले तेली, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोपीचंद कदम, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा चे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधकारी महसूल अमृत नाटेकर यांच्या सह सर्व संबंधित शासकीय विभाग प्रमुख उपस्थित होते.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जिल्ह्यात जास्तीत जास्त कामे सेल्फ वर ठेवून ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करावा. तसेच पाणंद रस्त्याची मंजूर असलेली १ हजार १४६ कामापैकी ६६ कामे सुरू आहे तर उर्वरित कामे त्वरित सुरू करावीत. राष्ट्रीय ग्रामीण जीवन ज्योती अभियान अंतर्गत मोठ्या प्रमाणावर महिला बचत गटाची स्थापना करून त्यांना बँकांकडून कर्ज पुरवठा करण्याच्या दृष्टीने योग्य नियोजन करावे. जिल्ह्यात सन २०२४-२५ मध्ये लखपती दीदींची संख्या ९८ हजार इतकी असून ही संख्या मोठ्या प्रमाणावर कशा पद्धतीने वाढेल यासाठी प्रयत्न करावेत अशा सूचना समिती अध्यक्ष खासदार प्रणिती शिंदे यांनी दिल्या.

पाणंद रस्त्याची कामे सुरू करताना एक किलोमीटर रस्त्यासाठी वीस लाख रुपयांचा स्लॅब आहे. त्यावरती अंदाजपत्रक गेल्यास पानंद रस्त्याच्या कामांना मंजुरी मिळत नाही. तरी केंद्र शासनाच्या माध्यमातून एक किलोमीटर रस्त्यासाठी २० लाखाची मर्यादा काढून टाकल्यास ही कामे मोठ्या प्रमाणावर करता येऊ शकतात अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. सद्यस्थितीत सर्व तालुक्यात किमान २०० कामे पानंद रस्त्याची सुरू होऊ शकतात परंतु ते सर्व रस्ते कच्चे घ्यावे लागतील.

**केंद्र शासनाच्या सर्व योजनांचा लाभ विहित वेळेत शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेने नियोजन करण्याच्या सूचना**

तहसीलदार यांच्याकडे रस्ते बाबत प्रलंबित केसेस चा निकाल लावण्या बाबतची कार्यवाही लवकरच करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात महिला बचत गटाची संख्या मोठ्या प्रमाणावर असून या बचत गटांच्या महिलांना तालुका स्तरावर नियोजन समितीच्या निधीतून महिला भवन निर्माण करून विसावा सुविधा उपलब्ध करण्यात येईल.

तसेच तालुक्यातील इतर मोठ्या गावातही सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. महिला बचत गटांना ३२० कोटीचा कर्ज पुरवठा करण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले होते, ते आज रोजी पर्यंत ३३३ कोटी कर्ज वाटप बचत गटांना झालेले आहे असेही त्यांनी सांगितले. त्याप्रमाणेच प्रधानमंत्री ग्राम सडक योजना याची




स्वतंत्र बैठक घेऊन घेण्यात आलेल्या कामाची सविस्तर माहिती संबंधित खासदार व आमदार महोदयांना उपलब्ध करून देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, महापालिका आयुक्त शितल उगले तेली व स्मार्ट सिटी चे कार्यकारी अधिकारी गोपीचंद कदम यांनी बैठकीत अनुक्रमे ग्रामीण व शहरी भागातील विषयानुसार माहिती सांगितली.

यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील, धाराशिव चे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर, आमदार अभिजीत पाटील, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार नारायण पाटील आणि आमदार राजू खरे यांनी रोजगार हमी योजना, महिला बचत गट, महिला भवन निर्माण करणे, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, सोलापूर शहर भुयारी गटार योजना, पायाभूत सुविधा व विकास, आरोग्य योजना अशा अनेक केंद्रीय योजनेच्या अनुषंगाने संबंधित यंत्रणेला माहिती विचारून तसेच या अंतर्गत प्रलंबित असलेली कामे तसेच अनेक ठिकाणी कामात होत असलेल्या दिरांगाईच्या अनुषंगाने सूचना करून ही सर्व कामे वेळेत मार्गी लावण्याबाबत आवाहन करण्यात आले.

प्रारंभी केंद्र शासनाच्या योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी आपापल्या विभागांतर्गत सुरू असलेल्या योजनांची माहिती व सद्यस्थिती बैठकीत सादर केली.

**केंद्रीय योजना आढावा** – महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना,दिन दयाळ अंत्योदय योजना / राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, दिन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, दिनदयाळ अंत्योदय योजना शहरी, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, राष्ट्रीय सामाजिक साहय कार्यक्रम, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण (डइच-ॠ), राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (छठथउझ), केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान सोलापूर पाणीपुरवठा शहर, केंद्र शासन पुरस्कृत सोलापूर शहर भूयारी गटार योजना, अमृत ड्रेनेज, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (झचघडध), एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (खथचझ), भूमी अभिलेखाचे संगणकीकरण (छठङचझ), सोलापूर स्मार्ट सिटी, झ.च. स्व निधी, दिन दयाळ उपाध्याय ग्रामीण ज्योती योजना (ऊऊग-ॠध), प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, प्रधानमंत्री आवास योजना शहरी, प्रधानमंत्री कृषी विमा योजना, राष्टीय आरोग्य अभियान ग्रामीण, राष्ट्रीय आरोग्य अभियान शहरी, सर्व शिक्षा अभियान ग्रामीण, सर्व शिक्षा अभियान शिक्षण मंडळ शहर, समग्र शिक्षा / माध्यान्ह भोजन योजन शिक्षण मंडळ शहर, एकात्मिक बाल विकास योजना ग्रामीण, प्रधानमंत्री उज्वला योजना, Digital India Public Internet ccess Programme-Providing Service Centre on each Grampanchayat, पायाभूत विकास कार्यक्रम महामार्ग, टेलीकॉम, रेल्वे इ., सांसद आदर्श ग्राम योजना आणि रे नगर फेडरेशन तर्फे सोलापूर येथे प्रधानमंत्री आवास योजना शहरी, या प्रकारे खासदार प्रणिती शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील दिशा समितीने केंद्रीय योजनांचा सविस्तर आढावा घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे यांनी दिशा समितीच्या आजच्या बैठकीच्या विषयाची माहिती दिली तसेच बैठकीच्या शेवटी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

## थोडक्यात...

### भांडणाचा जाब विचारल्याच्या कारणावरून मारहाण

सोलापूर : कुमठा नाका संजय नगर येथे मागील भांडणाचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या इसमास चौघांनी मारहाण केल्याची घटना २५ जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी जयसिंग शिवसिंगवाले (वय ५५, रा. घर नंबर ०३, पतकी कारखाना, संजय नगर कुमठा नाका) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून सागर फटफटवाले, विठोबा फटफटवाले, नितीन बाबावाले, राज फटफटवाले यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७५ व्या वर्धापन दिनी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण संपन्न झाले.

रेल्वे मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या या शासकीय सोहळ्यात एकूण ३२ पथकांनी सहभाग घेतला होता. यावेळी पोलीस, गृहरक्षक दल, एनसीसी, स्काऊट तसेच शहरातील विविध विद्यालयाच्या विध्यार्थी-विद्यार्थ्यींनी यांच्या पथकाने केलेल्या संचलनाचे प्रांताधिकारी श्री. इथापे यांनी निरिक्षण करुन मानवंदना स्विकारली. शासकीय ध्वजारोहण समारंभास माजी आमदार प्रशांत परिचारक, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, पोलीस निरिक्षक विश्वजित घोडके, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, विजयकुमार जाधव, वैभव बुचके, उप कार्यकारी अभियंता भिमाशंकर मेटकरी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले यांच्यासह स्वांतत्र्यसैनिक, पदाधिकारी, शासकीय अधिकारी- कर्मचारी, तसेच मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संविधान उद्देशिकाचे वाचन करुन उपस्थितांना ध्वज प्रतिज्ञा देण्यात आली व उपस्थितांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली. तसेच पोलीस दलाच्या वतीने ध्वजास मानवंदना देण्यात आली. यावेळी प्रांताधिकारी इथापे यांच्या हस्ते सहभागी पथकांना प्रमाणपत्र आणि मानचिन्ह देण्यात आले



## माळकरंजा शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब: सुधाकर रणदिवे ,ता २६ तालुक्यातील माळकरंजा येथील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेत भारतीय प्रजासत्ताकाचा ७६ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री संतोष प्रभु भोजने व शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष तथा उपसरपंच श्री शरद गालट यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. गावातील कु.प्रिती मोरे हिची बृहन्मुंबई महानगरपालिकेत नियुक्ती झाल्याबद्दल शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. शाळेची शैक्षणिक सहल कोकण दर्शनासाठी गेली होती.यावेळी आहेत एस टी परीवहन सेवेतील चालक श्री नेताजी पाटील यांनी उत्कृष्ट सेवा दिल्या बद्दल गावकऱ्यांच्या व पालकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी वसंतराव काळे महाविद्यालय ढोकी येथील विद्यार्थ्यांचे छात्रसेवाकाल शिबिर माळकरंजा येथे चालू आहे. शिबिराचे नेतृत्व करणारे प्रा. बाबासाहेब मैंद यांनी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमास ग्रामविकास अधिकारी विरभद्र कोरे, पोलिस पाटील विशाल टिंगरे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष सारंग, अंगणवाडी ताई शालिनी सोनावणे यांच्या सह गावातील ग्रामस्थ पालक उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक श्री मकरंद नाडे, युवा प्रशिक्षणार्थी कुमारी मंजुश्री कराड यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री हनुमंत घाडगे यांनी तर आभार प्रदर्शन श्रीमती भारती सुर्यवंशी यांनी केले.

## स्नेहालय न्यू इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात




पंढरपूर/प्रतिनिधी : नेहले न्यू इंग्लिश स्कूल शाळेचे स्नेहसंमेलन अविष्कार २४ २५ उत्साही वातावरणात संपन्न झाले आहे. करमाळा शहरातील तसेच ग्रामीण भागातील वाडी वस्तीवरील सामान्य कुटुंबातील चिमुकले कलाकारांनी देशभक्ती पारंपारिक गीते, लोकगीते, मराठी हिंदी चित्रपट गीते, यावर बहारदार नृत्यविष्कार सादर केला.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन करमाळा तालुक्यातील कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरीक्षक संदेश चंदनशिव यांच्या हस्ते झाले. प्रमुख उपस्थिती सोलापूर जिल्हा भाजप सरचिटणीस गणेशजी चिवटे, यश कल्याणी संस्थेची संस्थापक अध्यक्ष गणेश करे पाटील, साहित्यिक डॉक्टर अंजली श्रीवास्तव मॅडम, स्नेहलेश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष जयवंत दळवी, सचिव तथा मुख्याध्यापिका धनश्री दळवी, ग्राहक पंचायतीच्या अध्यक्षा माधुरी परदेशी, माजी मुख्याध्यापिका नलिंबा पुंडे, भाजपचे नरेंद्र सिंह ठाकुर , राष्ट्रवादीचे सरचिटणीस आरोग्य तांगडे, डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे अध्यक्ष दिनेश मडके, माहिती अधिकार समितीचे अध्यक्ष विशाल परदेशी, साडी स्कूलचे ढवळे सर, दळवी मॅडम स्नेहल स्कूलचे संचालक रामचंद्र दळवी, मंजुळा वाघमारे सुमन दळवी सुलोचना दळवी करमाळा तालुका पत्रकार संघाचे सर्व सदस्य उपस्थित होते,

विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेबरोबर क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमात असाच भाग घेत राहावे सर्वांगी गुण त्यांच्या असणे आता काळाची गरज आहे भविष्यात कलाकार घडू शकतात स्नेहलई परिवाराकडून कलागुणांना व मिळत आहे शाळेची प्रगती होत आहे.


## भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात ठिकठिकाणी तिरंग्याची आकर्षक रोषणाई

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा आकर्षक व नयनर्रम विद्युत रोषणाई करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज शोत्री यांनी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात श्री विठ्ठल सभा मंडळ, मंदिरातील आतील व बाहेरील बाजूस, श्री संत नामदेव पायरी याठिकाणी तिरंग्याची आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. याशिवाय श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, श्री संत तुकाराम भवन, श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास, वेदांत व्हिडिओकॉन भक्तनिवास, इत्यादी ठिकाणी देखील रोषणाई करण्यात आली आहे. यासाठी सुमारे एल इडी बल्ब १०० माळा, २५ फोकस व १०० ट्यूब चा वापर करण्यात आला आहे, तसेच सुरक्षितेच्या दृष्टीने आवश्यकता ती खबरदारी घेण्यात आली आहे. संपूर्ण रोषणाई मंदिर समितीमार्फत करण्यात आले असून त्याची जबाबदारी विद्युत विभाग प्रमुख शंकर मदने यांच्याकडे आहे यासाठी सात कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले आहे प्रजासत्ताक दिनाच्या औचित्य साधून केलेली ही तिरंगा रंगाची सजावट भाविकांसाठी पर्वणी ठरत आहे.



## सामाजिक कार्यकर्ते अतुल भाऊ भुसारी पाटील यांना साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाज भुषण पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटना अण्णाभाऊ साठे पुरस्कार समिती यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे सामाजिक राजकीय पत्रकारीता उघोग अश्या अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देण्याचे आयोजन अण्णाभाऊ साठे समाज भुषण २०२५च्या पुरस्कारासाठी सामाजिक राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत असताना बारलिगा येथील अगदी कमी वयात मध्ये अनेक सामाजिक काम केले अनेक पदांवर कार्यरत असताना त्यांच्या कार्याची आढाव घेऊन तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिप भाऊ गवई यांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाज भुषण २०२५च्या पुरस्कारासाठी यांची निवड करण्यात आली असताना अनेक स्तरांतुन अभिनंदन होत आहे